ISSN - 2229 - 4929

# अक्षर वाङ्मय

४ मार्च २०२०




संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं.- MAHMAR-36829-2010

ISSN : 2229-4929

# अक्षर वाङ्मय

**०४ मार्च २०२०**

: संपादक :

**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

: कार्यकारी संपादक :

**डॉ. भास्कर ताम्हनकर**

: संपादक मंडळ :

**डॉ. शशिकांत श्रृंगारे**

**डॉ. शीतल गोर्डे-पाटील**

: मार्गदर्शक :

**श्री. सागर फडके**

**प्रकाशक :** सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर-४१३५१५.

**मुद्रक :** कल्पना मल्टीटेक, ४६१/४ सदाशिव पेठ, पुणे-३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ.नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव', रुक्मे नगर,
थोडगा रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५, भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१,
ई-मेल : suryawanshinanasaheb67@gmail.com

**अक्षर जुळणी :** शिवाजी ज्ञा. पांचाळ, लातूर, भ्रमणध्वनी : ९७६६२४०१२६,
ई-मेल : shivajipanchal8@gmail.com

**स्वागत मूल्य :** रू.१,०००/-

*अक्षर वाङ्मयातील प्रकाशित मजकूराशी व लेखकांच्या मताशी प्रकाशक, संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.*

| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| ३६. | स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवादी साहित्य | उज्वला सुशांत पाटील | १९७ |
| ३७. | आदिवासी कातकरी जमातीच्या लोकगीतातील'स्त्री' चित्रण | स्नेहल जयराम सावळे | २०४ |
| ३८. | लोकसाहित्यातून उमटलेले स्त्री चित्रण लोकसाहित्यातील स्त्री जीवन : एक अभ्यास | वर्षा बाळासो तांदळे | २०९ |
| ३९. | दलित स्त्री आत्मकथनाचे स्वरूप | बाळासो आण्णा सुतार | २१३ |
| ४०. | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातील स्त्रीवादी जाणिवा | डॉ. प्रीती पाटील | २१७ |
| ४१. | स्त्रीवादी साहित्य : नवी दिशा आणि आव्हाने | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | २२१ |
| ४२. | लोकसाहित्यातील लोकगीतातून उमटलेले स्त्री चित्रण | विजयकुमार शंकरराव शिंदे | २२६ |
| ४३. | स्त्रीवादी साहित्य समीक्षा | राजकुमार दादाराव तरडे | २३० |
| ४४. | विभावरी शिरुरकरांच्या 'कळ्यांचे नि:श्वासमधील स्त्रीचित्रण | धनश्री विश्वास पाटील | २३३ |
| ४५. | स्त्रीवादी संकल्पना आणि अनुराधा वैद्य | भारत रामजी बांडे | २३६ |
| ४६. | 'तीन दगडाची चूल' मधील स्त्रीवादी जाणिवा | डॉ. नम्रता हत्तळ्गे | २४० |
| ४७. | स्त्रीवाद आणि मराठी साहित्य (भूमी या कादंबरीच्या अनुषंगाने) | प्रियंका अशोक कुंभार | २४५ |
| ४८. | समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहीत्य | मंगेश पंढरीनाथ जोर्वेकर | २५० |
| ४९. | स्त्रीवादी साहित्य : नवी दिशा आणि आव्हाने | अमोगसिध्द शिवाजी चेंडके | २५५ |
| ५०. | लोकगीतातून अभिव्यक्त होणारी स्त्रीप्रतिमा | सीमा राजेश वीर | २६१ |
| ५१. | स्त्रीवादी चळवळीच्या आद्य प्रणेत्या पंडिता रमाबाई यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार | डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | २६७ |
| ५२. | स्त्रीवादी प्रतिबिंबित : रीटा वेलिणकर | मच्छगंधाली नितीन तारळेकर | २७१ |

# स्त्रीवादी साहित्य : नवी दिशा आणि आव्हाने

डॉ. विशाल प्रकाश लिंगायत
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग), श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

प्रास्ताविक :

आजच्या समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान काय ? असा प्रश्न विचारल्यास 'स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू असा नियम करून प्रत्येक धर्मातल्या पुरूषाने आपले धर्मातले जे स्थान आहे, ज्या सवलती आहेत त्या बाजूला करून घेतल्या आहेत आणि स्त्रियांना गौण स्थान दिले आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास हिंदू धर्माचे देता येईल. 'पती हाच परमेश्वर ही शिकवण मुलींना लहानपणापासूनच दिली जाते. पतीची सेवा केली पाहिजे, वेगवेगळी व्रते केली पाहिजेत, स्त्रियांनी कसे वागावे, काय खावे, काय घालावे यावर बरेच निर्बंध घातले आहेत. रूढी–परंपरेच्या वाहक सर्व धर्मातल्या स्त्रियाच आहेत. 'याचप्रमाणे मुस्लिम धर्मामध्येही 'पती के पाँव के नीचे जन्नत रहती है असा समज रूढ आहे. पती लाथा घालतो, पत्नी लाथा खाते; कारण शेवटी त्याच्या पायाखाली स्वर्ग असतो; त्याच स्वर्गात पत्नीला जागा मिळणार असते.[१] या आणि अशा कल्पना केवळ स्त्रियांच्या बाबतीत सर्व धर्मात रूढ झालेल्या आहेत. 'स्त्री' च्या माणूसपणाचा विचार हे स्त्रीवादी विचारसरणीचे केंद्रस्थान आहे. 'स्त्री ही प्रथम माणूस, मानव म्हणून जन्माला येते. पण ज्या समाजात तिचा जन्म होतो. तो समाज तिच्याकडे माणूस म्हणून न पाहता 'बाई म्हणून पाहतो व तिला बाईच्या पारंपरिक चौकटीत बसवून तिच्यावर बाईपणाचा ठसा उमटवितो. त्यामुळे पुढे या स्त्रीला सबंध आयुष्यात 'बाई म्हणूनच जीवन जगावे लागते. हेच आजच्या स्त्रीचे आणि समाजव्यवस्थेचे खरे स्वरूप आहे.

आज मोकळेपणाने वावरणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की, आजची स्त्री ही पुरूषांच्या गुलामगिरीतून मुक्त झाली आहे असे वाटायला लागते. मात्र काही अपवादात्मक ठिकाणीच हे चित्र बघावयास मिळते. शतकानुशतकांचा विचार केल्यास पन्नास वर्षापूर्वी स्त्रियांचे स्वातंत्र्य हा भयावह विषय होता. भारतीय स्त्री जीवनाचा प्राचीन काळापासून १८ व्या १९ व्या शतकापर्यंतचा इतिहास बघितल्यास काही घटनाप्रसंग, चालिरीती, रूढी, परंपरा स्त्री स्वातंत्र्यासाठी फारच प्रतिकूल ठरतात. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. पुरूषाच्या अधिपत्याखाली राहून तिने फक्त घर सांभाळावे, पुरूषाच्या अंकीत राहून त्याच्या मर्जीप्रमाणे आपले जीवन कंठावे, अशी तिची अवस्था होती. 'जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व अवस्थांमध्ये स्त्रियांना पुरूषांपेक्षा हीन लेखले जाते, हे एक ऐतिहासिक सत्य आहे.[२] या समाजव्यवस्थेत एक उपभोग्य वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाई. शारीरिक गरजांपलीकडे माणसाच्या आणखी काही गरजा असतात हे स्त्रीच्या बाबतीत पद्धतशीरपणे विसरले गेले. त्यामुळे तिच्या शरीराचा विकास एका मर्यादेपर्यंत येऊन थांबला. आत्मगौरव, स्वाभिमान, आत्मविश्वास, स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि सामाजिक कार्यात तिचा सहभाग यासारख्या तिच्याही काही इच्छा असतात, गरजा असतात ही जाणीव या काळातील पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेला झाली नाही.

लागता गृहउद्योग करू लागल्या आहेत. स्त्रियांच्या मनातील न्यूनगंड जोपर्यंत कमी होत नाही, तोपर्यंत तुमच्या आमच्या घरात इंदिरा गांधी, कल्पना चावला, सानिया मिर्झा, डॉ. किरण बेदी, प्रतिभाताई पाटील, सरोजिनी नायडू, मृणाल गोरे यासारख्या कर्तृत्ववान स्त्रिया जन्म घेणार नाहीत असे मला वाटते.

भारतीयच काय पाश्चिमात्य देशातील पितृसत्ताक समाजव्यवस्था मूल जन्माला आल्यापासूनच त्याला पारंपरिक चौकटीत बसविते. पुढे या मुलालाही हीच आपली चौकट आहे असे वाटून त्याप्रमाणे ते जीवन जगते. स्त्रीलिंगी अपत्य जन्माला आले की, तिला बाईपणाच्या चौकटीत बसविले जाते. तिला वेगवेगळ्या प्रतिमा लावल्या जातात, स्त्री देवता, माता, पत्नी, दासी, कामिनी, स्त्री म्हणजे अबला, नाजूक, लाजरी, भित्री, निसर्गतःच दुबळी अशा काही प्रतिमा लावल्या जातात. 'अबला, माता, दासी किंवा देवता म्हणून जी स्त्रीरूपे साहित्यात येतात ती पुरुषप्रधान संस्कृतीचा आविष्कार असतात.[९] स्त्रियांनी या प्रतिमांमधून बाहेर यावे, या वर्तुळातून बाहेर पडावे, माणूस म्हणून जगावे. हीच आजच्या समाजव्यवस्थेची खरी गरज आहे, हेच आजच्या स्त्रीवादी साहित्यासमोरील खरे आव्हान आहे असे मला वाटते.

**संदर्भ टीपा :**


१ डॉ. शिंदे संजय, साहित्य विचार आणि परिवर्तन प्रत्यय, प्रबोधन प्रकाशन- औरंगाबाद, प्र. आ., एप्रिल - २०१५, पृ. १३६

२ साळुंखे आ. ह., 'हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङमय गृह, मुंबई, बा.आ., जानेवारी- २०१५, पृ. ११

३ डॉ. धोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजना, दिलीपराज प्रकाशन, प्र. आ. पुणे- १९९३, पृ. ०८

४ कर्वे स्वाती, स्त्रीविकासाचे नवे क्षितीज, प्रतिमा प्रकाशन, प्र. आ. पुणे- २००७, पृ. १७

५ डॉ. शिंदे संजय, उ. नि. १, पृ. १३६

६ डॉ. वरखेडे मंगला, स्त्रियांचे कथालेखन : नवी दृष्टी नवी शैली, साकेत प्रकाशन-औरंगाबाद, प्र.आ. २००५, पृ. ०६

७ डॉ. शिंदे संजय, उ. नि. १, पृ. १३७

८ तत्रैव, पृ. १३७

९ डॉ. धोंगडे अश्विनी, उ. नि. ३, पृ. ०६